MHKO100004662022

## नियमीत दिवाणी दावा क्र.११७/२०२२ मधील निशाणी क्र.२६ वर आदेश (रविंद्र आर्दाळकर वि. रमेश कांबळे)

प्रतिवादी क्र.१ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत " आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी १५ ला तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणून दिनांक १७.०८.२०२२ रोजी दिले होते. प्रतिवादी पाठदुखीमुळे आजारी असल्यामुळे त्याला मुळ दाव्यास कैफियत देता आली नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ सुधाकर पोवार हे देखील आजारी असल्यामुळे त्यांचा देखील प्रतिवादी क्र.१ यांच्याशी संपर्क होवू शकला नाही. प्रतिवादी क्र.१ यांच्या नावामध्ये असलेली चुक दुरूस्ती करण्यासाठी दिलेला निशाणी क्र. १८ चा अर्ज दिनांक १२/१०/२०२३ रोजी मंजूर करण्यात आला असून त्यानंतर प्रतिवादी क्र.१ मुळ दाव्यात आलेले आहेत. कैफियत दाखल करून घेतल्यास वादीचे काही नुकसान होणार नाही. याउलट कैफियत दाखल करून न घेतल्यास प्रतिवादी क्र.१ यांच्या कायदेशीर हक्कास बाधा येणार आहे. कैफियतदाखल करून न घेतल्यास त्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे निशाणी २७ वर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील संपुर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दाव्याची समन्स व नोटीस दिनांक ०६/०७/२०२२

रोजी लागू झाल्यानंतर त्यांना दाव्यास कैफियत देण्यास कोणतीही अडचण नव्हती. प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियत देण्यास टाळाटाळ केली आहे. अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नाही. सबब अर्ज रक्कम रूपये १०,०००/- चे खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

**३.** प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ हे दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर न्यायालयात दिनांक १५/०६/२०२२ रोजी हजर झाले. प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत कैफियत दिली नाही म्हणून त्यांच्याविरूध्द कैफियत नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. यापुर्वी प्रतिवादी क्र.१ यांनी सदर दाव्यास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०८/०४/२०२५ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.१ यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी क्र.१ यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी आपली कैफीयत दाखल करण्यास बराच उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांच्यावर खर्च बसवून सदरचा अर्ज

मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१)** प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्यांची निशाणी २६ च्या अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.11.04 17:23:36 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०४/११/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज